स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'मानव्य' विद्याशाखेअंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी.
(विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर करावयाचा
शोध प्रबंधाचा आराखडा

''मराठवाड्यातील कथनात्मक ग्रामीण साहित्य आणि ऱ्हासमान मराठी बोली-भाषा''

संशोधक

तुकाराम माणिकराव पवार

मार्गदर्शक

डॉ. साहेब खंदारे

प्राचार्य माधवराव पाटील महाविद्यालय, पालम
ता.पालम जि.परभणी

संशोधन केंद्र

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

२०१७

मराठवाड्यातील कथनात्मक ग्रामीण साहित्य आणि ऱ्हासमान मराठी बोली-भाषा

प्रस्तावना :

साधारणतः सन १९२५ पासून मराठी साहित्यात ग्रामीण जीवनदर्शनाचे प्रयत्न लेखकांकडून होऊ लागल्याचे दिसून येते; म्हणून तेंव्हापासून ग्रामीण साहित्याचा प्रवाह सुरू झाला असे म्हणता येते. असे असले तरी ग्रामीण साहित्याची प्रस्फूरणे ही महानुभाव संप्रदायापासूनच दिसून येतात. या प्रवाहाची सुरवात १९२५ अशी धरली तरीही साधारणतः नव्वद वर्षांची एक दीर्घ परंपरा या साहित्य प्रवाहाला आहे.

ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा काहीही असोत परंतु ते निर्माण झाले ते केवळ ग्रामीण पर्यावरणातच म्हणजे कृषी आधारीत ग्राम संस्कृती हीच या साहित्याच्या केंद्रस्थानी होती आणि आहे. त्यामुळे ग्रामीण साहित्य आणि ग्रामीण भाषा यांचे नाते अभिन्नच असायला हवे आणि ते तसे असल्याचेही दिसून येते.

प्रदेशनिहाय भाषा बदलत जाते. महाराष्ट्रातही तशी ती बदलताना दिसते. म्हणूनच प्रदेशवार भाषा आणि बोली पहावयास मिळतात. कोकणी, खानदेशी, हळबी, वैदर्भी, नागपूरी, मराठवाडी अशी मराठी भाषेची विविध रूपे त्यामुळेच दिसून येतात. त्यातही पुढे जाऊन प्रत्येक प्रांतातील भाषेच्या विविध बोली व लकबी पाहावयास मिळतात. जसे की मराठवाड्याच्या मराठी भाषेत लातूर, उस्मानाबाद या दोन जिल्ह्याची मराठी बोलीभाषा व तिच्या लकबी ह्या वेगळ्या, उदगीर व त्या सीमावर्ती भागातील मराठी भाषेच्या बोली व लकबी वेगळ्या परभणी, हिंगोली व नांदेडचा काही भाग येथील मराठी भाषा व बोलीच्या लकबी वेगळ्या; तर जालना, औरंगाबाद या जिल्ह्यामधूनही बोलीच्या विविध लकबी पाहावयास मिळतात.

ग्रामीण लेखक ज्या प्रदेशातील ग्रामीण पर्यावरणात वाढतो व ग्रामीण जीवनाचे चित्रण करू लागतो त्या प्रदेशातील भाषा व बोली ग्रामीण शब्दकळेसह त्याच्या साहित्यातून येणे अपरिहार्य आहे. तशी ती मराठवाड्याच्या कथात्मक ग्रामीण साहित्यात आलेली आहे का ? असेल तर तिचे स्वरूप व वास्तविक ग्रामीण जीवनातील बोली भाषा यांचे स्वरूप तपासून पाहणे मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आणि तिला अभिजात भाषेकडे वाटचाल करण्यासाठी महत्त्वाचे आणि अपरिहार्य ठरते या अपरिहार्यतेतून प्रस्तुत विषय संशोधनासाठी घेतला आहे.

संशोधनाची गरज :

प्रस्तावनेत विशद केल्याप्रमाणे मराठी भाषेच्या संवर्धनाचे प्रयोजन या संशोधनामागे आहेच. कारण एकीकडे मराठी भाषा वाचली पाहिजे, जगली पाहिजे असे म्हणणाऱ्याचा एक वर्ग झपाट्याने मराठीची काळजी वाहण्याची मागणी करतो आहे. दुसरीकडे शासन स्तरावर समित्या नेमून अभिजन भाषेसाठी प्रयत्न होत आहेत. मात्र प्रत्यक्षात लोकव्यवहारातून किती शब्द काळाच्या पडद्याआड जात आहेत. याची नोंद ठेवण्याचे सायास फारसे कोणी करताना दिसत नाही.

दैनंदिन जीवनातून ऱ्हासमान होणाऱ्या भाषिक शब्दकळेचा आढळ लिखित साहित्यात असणे हे गरजेचे आहे. तशा नोंदी त्या-त्या प्रदेशातील ग्रामीण साहित्यात आलेल्या आहेत काय ? असा प्रश्न प्रस्तुत संशोधनाचा विषय निवडता समोर आला आणि या अंगानेही फारसे काम झाले नसल्याचे आढळून आले. ऱ्हासमान मराठी भाषा व बोलीतील शब्दकळेतील कितीसे शब्द कथात्मक ग्रामीण साहित्यात आलेले आहेत. याचा शोध घेणे ही संशोधनाची गरज आहे.

मर्यादा आणि व्याप्ती :

वर्तमान महसूली मराठवाडा ही प्रस्तुत संशोधन विषयाची व्याप्ती आहे. त्याचबरोबर केवळ मराठवाड्यातील कथनात्मक ग्रामीण साहित्याची मर्यादा या कार्यासाठी घालून घेतली असली तरीही ग्रामीण साहित्याच्या आरंभापासून वर्तमानापर्यंत निर्माण झालेल्या कथनात्मक कलाकृतीचा अभ्यास ही संशोधनाची व्याप्ती आहे. म्हणजेच केवळ कथा आणि कादंबरी या दोन प्रकारात १९२५ पासून लिहिले गेलेले साहित्य ही या संशोधनाची लिखित सामुग्री असेल तर मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यात बोलल्या जाणारी मराठी भाषा व तिच्या बोली यांचा अभ्यास या व्याप्तीत अंतर्भूत असेल.

गृहितक :

१. मराठवाड्यातील मराठी भाषा आणि बोलीतील शब्दकळेचा मोठ्या प्रमाणावर ऱ्हास झाला आहे.

२. मराठवाड्यातील मराठी भाषा आणि बोलीतील शब्दकळेच्या ऱ्हासासाठी ग्रामीण संस्कृतीतील बदल कारणीभूत आहे.

३. मराठवाड्यातील कथनात्मक ग्रामीण साहित्याने मराठी भाषा आणि बोलीतील शब्दांना मोठ्या प्रमाणात साहित्यात स्थान दिले आहे.

या तीनच गृहितकावर हे संशोधन आधारीत आहे.

संशोधन पद्धती :

मराठवाड्यातील कथनात्मक ग्रामीण साहित्य आणि ऱ्हासमान मराठी बोली भाषा या शोध प्रबंधासाठी विश्लेषण व विवरणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल त्याचबरोबर आंतरविद्याशाखीय संशोधन सिद्धांतानुसार येणाऱ्या शोध पद्धतीचाही अवलंब, वर्गीकरण वर्गांकनासाठी करण्यात येईल.

संशोधनाचे महत्त्व :

सध्या मराठीच्या जगण्या मरण्याचा प्रश्न हा सामाजिक, सांस्कृतिक स्वरूपात जसा चर्चेला आलेला आहे. तसाच तो एक राजकीय मुद्दा म्हणूनही पुढे आलेला दिसून येतो. त्यामुळे भाषा आणि साहित्य या अंगाने संशोधन होण्याची गरज आहे. त्याचबरोबर मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा यासाठी देखील अशा संशोधनाचे महत्त्व आहे. ज्यामुळे गत शंभर वर्षातील भाषिक शब्दकळेचा विचार संशोधन रुपात पुढे येईल.

प्रकरण रचना :

मराठवाड्यातील कथनात्मक ग्रामीण साहित्य आणि ऱ्हासमान मराठी बोली-भाषा

प्रकरण -१ विषय प्रवेश :

'मराठवाड्यातील कथनात्मक ग्रामीण साहित्य आणि ऱ्हासमान मराठी बोली-भाषा' या विषयावर संशोधन करण्यासाठी वापरण्यात येणारी संशोधन पद्धती, विषयाची व्याप्ती, मर्यादा, विषयानुषंगाने झालेला संशोधनाचा आढावा आदी बाबींची चर्चा या प्रकरणात केली जाईल आणि या संदर्भानेच पुढील संशोधनाकडे वाटवाल केली जाईल.

प्रकरण -२ मराठवाड्यातील मराठी भाषा आणि तिचे लोकतत्वीय स्वरूप :

या प्रकरणात मराठवाड्यातील मराठी भाषा आणि तिच्या बोलीच्या स्वरूपाचा शोध घेतला जाईल. ही भाषा आणि बोली यामध्ये असणाऱ्या लोकतत्त्विय शब्दकलेच्या स्वरूपाचे विश्लेषण केले जाईल व त्यावरून शब्दकलेच्या लय, उच्चार आणि हेल या संदर्भाचाही शोध घेण्यात येईल.

प्रकरण -३ मराठवाड्यातील ऱ्हासमान लोक संस्कृती आणि भाषिक शब्दकळा

साधारणतः गेल्या २५-३० वर्षात मराठवाड्यातील लोकसंस्कृती झपाट्याने ऱ्हास पावत

चालली आहे. अशा ऱ्हासमान लोकसंस्कृतीच्या बरोबरच तिचे अभिन्न अंग असणारी शब्दकलाही ऱ्हास पावत आहे त्यामुळे ऱ्हासमान लोकसंस्कृतीचा शोध घेऊन त्यातील कालबाह्य होणाऱ्या शब्दकलेचा धांडोळा या प्रकरणात घेतला जाईल.

प्रकरण -४ मराठवाड्यातील कथनात्मक ग्रामीण साहित्य आणि त्यातील ऱ्हासमान लोक संस्कृतीचा आढळ :

साहित्य हे भाषिक माध्यमात प्रगटते. मराठवाड्यातील मराठी कथा आणि कादंबरी हे दोन्ही कथनात्मक ग्रामीण साहित्य प्रकार आहेत. या दोन्ही प्रकारातील साहित्याचा शोध येथे घेतला जाईल. मराठवाड्यातील एकूणच कथनात्मक ग्रामीण साहित्यातून या प्रदेशातील ऱ्हासमान लोकसंस्कृतीचे चित्र आले आहे का ? आणि आले असेल तर ते कशा स्वरुपात आले आहे याचा शोध घेऊन लोकसंस्कृती बरोबरच लोकभाषेतील शब्दकळा या साहितयातून कशी आलेली आहे याचाही शोध या प्रकरणात घेण्यात येईल.

प्रकरण -५ मराठवाड्यातील कथनात्मक ग्रामीण साहित्यातील सुटलेले भाषाविषयक संदर्भ

मराठवाड्यातील एकूणच कथनात्मक ग्रामीण साहित्यात आलेले ग्रामीण शब्दकळेचे भांडार शोधल्यानंतर या प्रकरणात मराठवाड्यातील लोकजीवनात बोलले जाणारे, भाषेत अस्तित्वात असलेले परंतु प्रत्यक्षात साहित्यात न आलेले जे म्हणून भाषासंदर्भ असतील त्याचा शोध घेण्यात येईल.

प्रकरण -६ मराठवाड्यातील कथनात्मक ग्रामीण साहित्याने दुर्लक्षिलेल्या आणि काळाच्या पडद्याआड गेलेल्या लोकसंस्था आणि भाषिक शब्दकळा.

मराठवाड्याच्या लोकमानसात आणि जनजीवनात शेकडो लोकसंस्थांचा आढळ आहे. ह्या सर्व लोकसंस्थांमध्ये मोठ्या प्रमाणात गद्य-पद्यांनी मिश्रीत रचनाही आहेत. तसेच अनेक विधी-विधानेही आहेत. ही सर्व भाषेतून सिद्ध होतात. अशा गोंधळ, वासूदेव, जागरण, रानसितळाई इत्यादी लोकसंस्था मराठवाड्यातील कथनात्मक ग्रामीण साहित्यात चित्रित झालेल्या आहेत का ? याचा शोध घेऊन ज्या लोकसंस्थांचे चित्रण ग्रामीण कथनात्मक साहित्यात आलेले नाही त्या कोणत्या आणि त्यातील भाषिक शब्दकळा कोणती याचा शोध या प्रकरणात घेण्यात येईल.

वरील प्रमाणे प्रकरण संशोधन करून शेवटी संदर्भसूची, संशोधन साहित्यसूची व इतर पुस्तकसूची जोडण्यात येईल.

संदर्भसूची :

१. रा.रं.बोराडे

कादंबरी

१. पाचोळा (१९७१)

२. सावट (१९८७)

३. आमदार सौभाग्यवती (१९८८)

४. चारापाणी (१९९०)

५. रहाटपाळणा (१९९८)

कथासंग्रह :

१. पेरणी (१९६२)

२. ताळमेळ (१९६६)

३. मळणी

४. वाळवण (१९७६)

५. राखण (१९७७)

६. खोळंबा

७. नातीगोती

८. कणसं आणि कडबा (१९९४)

९. वरात

१०. बोळवण

११. माळरान

१२. गोंधळ

१३. बुरूज

१४. हेलकावे

२. भास्कर चंदनशिव

कथासंग्रह

१. जांभळढव्ह (१९८०)

२. मरणकळा (१९८३)

३. अंगारमाती (१९९१)

४. नवी वारूळं (१९९२)

५. बिरडं (१९९९)

३. भीमराव वाघचौरे

कादंबरी

१. नवं काटवन
२. पाणघळी
३. मुठमाती

कथासंग्रह

१. रानखळगी
२. गराडा
३. अंगारकूस

४. शेषेराव मोहिते

कादंबरी

१. असं जगणं तोलाचं (१९९४)
२. धूळपेरणी

५. मथु सावंत

कथासंग्रह

१. तिची वाटच वेगळी
२. पाणबळी
३. पाण्यातील पायवाट

६. नागनाथ पाटील

कादंबरी

१. लम्बाडी

कथासंग्रह

१. कोंडणातील जिनं

७. आसाराम लोमटे

कथासंग्रह

१. ईडा पिडा टळो
२. आलोक
३. धूळपेर

८. जगदीश कदम

कथासंग्रह

१. गाडा

**९.	विलास सिंदगिकर**

कथासंग्रह

१.	रक्त आणि भाकर

मार्गदर्शक
डॉ.साहेब खंदारे
प्राचार्य माधवराव पाटील महाविद्यालय, पालम
ता.पालम जि.परभणी

संशोधक
तुकाराम माणिकराव पवार